# नोंदणी  झालेल्या दस्तास जादा भरलेल्या नोंदणी फी चा परतावा
# Refund of excess Registration Fee
# प्रक्रीया (Process)

## अ. पक्षकाराकडून करावयाची प्रक्रीया -

1. जादा नोंदणी फी चा परतावा मिळणेसाठी ज्या दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त नोंदणी झालेला आहे, त्या कार्यालयास, सह जिल्हा निबंधक यांचे नावे अर्ज करावा.
2. अर्जास रुपये 5/- चा चिकट न्यायालयीन मुद्रांक (कोर्ट फी लेबल)चिकटविणे

## ब. दुय्यम निबंधक कार्यालयाकडून करावयाची प्रक्रीया -

1. असा अर्ज प्राप्त झाल्यानंतर, दुय्यम निबंधक अर्जाचे अनुषंगाने दस्ताची छाननी करेल
2. अर्जातील मुददयामध्ये तथ्यांश असल्याचे निदर्शनास आल्यास, परतावा मिळणेसाठी तसा प्रस्ताव सह जिल्हा निबंधक कार्यालयात सादर करेल.

## क. सह जिल्हा निबंधक कार्यालयाकडून करावयाची प्रक्रीया -

1. प्राप्त प्रस्ताव, अर्जदाराचा अर्ज व दस्ताची प्रतीचे अवलोकन करून अर्जातील मुददयामध्ये तथ्यांश असल्याचे निदर्शनास आल्यास, परतावा मिळणेसाठी तसा प्रस्ताव सह जिल्हा निबंधक कार्यालय नोंदणी महानिरीक्षक,पुणे कार्यालयास पाठवेल

## ड. नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाकडून करावयाची प्रक्रीया -

1.प्राप्त प्रस्ताव, अर्जदाराचा अर्ज व दस्ताची प्रतीचे अवलोकन करून अर्जातील मुददयामध्ये तथ्यांश असल्याचे निदर्शनास आल्यास, नोंदणी महानिरीक्षक,पुणे कलम 80 अ खाली परतावा मंजूर करतात.

यासंबधात अधिक माहीतीकरीता, सारथी ‹दस्त नोंदणी‹ इतर काही महत्वाच्या बाबी ‹नोदंणी फी परतावा पहावे.